# आदिवासी समाज आणि संस्कृतीचा सामाजिक अंगाने अभ्यास

**आर. मुरमाडे**
मराठी विभाग, कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, तुकूम, चंद्रपूर
murmaderu06gmail.com

## सारांश

*आदिवासी समुदाय हा भारतीय संस्कृतीचा एक अविभाज्य भाग आहे. आदिवासी केवळ भारतात आहेत असे नाही तर जगाच्या इतरही भागात आदिवासींचे वास्तव्य असल्याचे स्पष्ट दिसून येते. साधारणतः आदिवासींचा सांस्कृतिक अभ्यास जागतिक पातळीवर १७ व्या शतकापासून सुरु झाला. १६४० मध्ये वोल्तर हेमांड यांनी 'मादागास्कर बेटावरील आदिवासी लोक जगात सुखी आहेत' या विचाराने आले. कालांतराने आदिवासींसाठी नोबेल सॅव्हेज ही संज्ञा रुढझाली.*

***बीज संज्ञा :*** *निसर्गपूजक , स्वतंत्र लोकभाषा, दुर्गम भागात वास्तव्य, संस्कृती जोपासना, सामाजिकता.*

## प्रस्तावना

आदिवासी समूहाला फार मोठी ऐतिहासिक पार्श्वभूमी लाभली आहे. त्यांचे सामाजिक, सांस्कृतिक जीवन लक्षात घेत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भारतीय राज्यघटनेत आदिवासींसाठी 'अनुसूचित जमाती' असे संबोधले आहे. त्यामागे त्यांचे सामाजिक व सांस्कृतिक जीवनमान सुधारणे हा उदात्त हेतू होता. परंतु आज जागतिकीकरणाच्या एकविसाव्या शतकात आदिवासी समुदायाकडे बघण्याचा दृष्टीकोन कुठेतरी बदललेला दिसतो. या भूमीचे मालक ते आदिवासी होत. ही सत्यता कुणीही नाकारू शकत नाही. पण त्यांचेसाठी वेगवेगळी नामाभिधाने वापरली जाऊन त्यांचे मानसिक व सामाजिक खच्चीकरण केलेले दिसते.कुणी त्यांना वनवासी म्हणतो, कुणी गिरीजन, असूर, खुजे मागासलेले, असंस्कृत अडाणी अशाप्रकारे शब्दछल करणे चुकीचे आहे. ते कुठेतरी थांबणे काळाची गरज आहे.

## सामाजिकता

मानवाने जसजशी प्रगती साधली तसतसे त्यांचे मागील जीवनाविषयीचे कुतूहलही त्यांच्या मनात निर्माण झाले. आपल्या प्रारंभिक अवस्थेपासून माहिती मिळावी म्हणून तो मानवी इतिहासाचा मागोवा घेऊ लागला. आणि त्याला जाणवले की, आजही काही मानवी समूह या प्रारंभिक जीवनाचाच अवलंब करीत आहेत; ज्यांना आपण आदिवासी म्हणतो. "त्यांची संस्कृती, जीवनशैली, त्यांची सामाजिक– आर्थिक व्यवस्था ही सारी आदिम जीवनाशी निगडीत असल्याने ते अभ्यासाचा, संशोधनाचा केंद्रबिंदू ठरले. पुढे युरोपियन साम्राज्यवादी आणि धर्मवादी धोरणांमुळे आदिवासी संस्कृतीचे अध्ययन सुरु झाले."[१]

आजच्या स्थितीत भारतात २०० पेक्षा अधिक आदिवासी जमाती आहेत. सर्वात अधिक संख्या झारखंड आणि छत्तीसगढ या राज्यात आहेत. मध्यप्रदेश, ओरिसा, गुजरात, महाराष्ट्र पश्चिम बंगाल या राज्यात आदिवासींची संख्या अधिक आहे. "महाराष्ट्रात सह्याद्रीत ठाणे, पुणे, नाशिक, अहमदनगर, रायगड, सिंधुदुर्ग, सातारा, या जिल्ह्याचा जो डोंगरी भाग आहे, त्यात वारली, कातकरी, ढाकर, कोकणा, महादेव कोळी, मल्हार कोळी, या जमातींचे आदिवासी राहतात. सातपुड्यात धुळे,जळगाव, अमरावती, नागपूर, औरंगाबाद या जिल्ह्यांचा भाग येतो. त्यात कोरकू, भिल्ल, पावरा, गावीत, धनक, दुबळा व पारधी या आदिवासी वस्ती आहेत. गडचिरोली, चंद्रपूर, भंडारा, यवतमाळ, नांदेड या गोंडवनातील जिल्ह्यात गोंड, कोलाम, परधान, व माडिया या आदिवासी जमाती राहतात."[२] थोडक्यात ज्ञानाच्या दृष्टीने मागासलेला अक्षर ओळख नसलेल्या व रक्तसंबंध यावर आधारित सामाजिक व राजकीय रितीरिवाजांचे प्रामाणिकपणे पालन करणाऱ्या एक जिनसी गटाला 'आदिवासी समाज' म्हणतात.

## व्याख्या

आदिवासी समाज आणि संस्कृती विषयी विविध विचारवंतानी व्याख्या केल्या. त्यामध्ये "आदिपासून किंवा सुरुवातीपासून दऱ्याखोऱ्यात किंवा जंगलात निवास करणारे म्हणजे आदिवासी होय. त्यामुळेच जंगलात किंवा डोंगराळ भागात राहणाऱ्या लोकांना आदिवासी असे संबोधले जाते."[३] अशी व्याख्या विचारवंत डॉ. प्रदिप आगलावे करतात. तर "आदिवासी हा देशाचा आदिपुरुष आर्यांचे हिंदुस्थानात आगमन होण्यापूर्वी आदिवासी हे या देशाचे मुलनिवासी होते."[४] असे प्रा. सीमा चव्हाण संबोधतात. वरील व्याख्यांचे संदर्भ लक्षात घेता आदिवासी हे देशाचे मुळनिवासी असून आदिम संस्कृतीची वैशिष्ट्ये त्यांच्यात प्रकर्षाने जाणवतात. त्यांचे जीवनमान, त्यांची भाषा, सामाजिक संकेत, लोकाचार इ. इतर समाजाहून वेगळे असल्याचे दृष्टीस येते. शिवाय ते सांस्कृतिकदृष्ट्याही इतरांपेक्षा वेगळे आहेत. भारतीय

संविधान परिशिष्ट ५ व्या व ६ व्या मध्ये अनुसूचित जमाती केलेला असून त्याद्वारे त्यांचे सामाजिक, आर्थिक, राजकीय व सांस्कृतिक हक्क आणि अधिकार बहाल केले आहे. एकूणच सांगायचे झाल्यास आदिवासी समाजाला शतकानुशतके या भूमीचे मालक म्हणून उच्च परंपरेचा सामाजिक वारसा लाभला आहे.

## संस्कृती

जगातील सर्व देशात आदिवासी जमाती आढळून येत असून आशिया, आफ्रिका आणि अमेरिका या खंडामधील देशात आजही आदिवासी जमाती मोठ्या प्रमाणावर आढळतात. इतर देशांप्रमाणे भारतातही आदिवासी जमाती मोठ्या संख्येने पसरले असल्याचे दिसते. या जमातींना विविध नावांनी संबोधिले आहेत. Aboriginols किंवा Aboriginals-म्हणजे आदी मुळचे रहिवासी, प्राचीन किंवा आदिवासी अये म्हटले जाते. "आदिवासी संस्कृती पृथ्वी निर्मितीपासून मानवी विकासाला आणि विस्ताराला प्राधान्य दिलेले आहे. अति संपन्न, समृद्ध, सुजलाम, सुफलाम स्थिती असलेला भूभाग ही प्राचीन आदिवासींची वसाहत – मातृभूमी व मुळचा प्रदेश होय. त्यांची स्वतःची भाषा, व लिपी होती. त्यांची संस्कृती धर्म व जीवनपद्धती होती. शिवाय समृद्ध समाजव्यवस्था व उत्तम संस्कृती धर्म व जीवनपद्धती होती. सोबतच नीतीमूल्ये, आदर्श तत्वज्ञान व गौरवशाली भूतकाळ होता. आदिम जमातीची संस्कृती अबाधितपणे टिकवून ठेवण्याचे काम युवागृहानीच केलेले आहे. एवढेच नव्हे तर तरुण पिढीला सर्वदृष्टींनी तयार करून त्यांच्यामध्ये ऐक्यभाव दृढ करण्यास युवागृहांचे कार्य अनन्यसाधारण आहे."[५] पण दुर्दैव असे की कालांतराने परकीय आक्रमणामुळे ही संस्कृती नष्ट झाली आणि ते रानावनात आश्रय घेऊन ते जगू लागले.

विदर्भातील आदिवासी समाज हा वारली, मना, गोवारी, गोंड, भिल्ल, पावरा, धानकर,कोरकू, संथाळ, खासी, तोडा, माडिया, राजगोंड इत्यादी अनेक जाती उपजाती असून प्रत्येक आदिवासी जमातीची एक सामान्य संस्कृती आहे. आदिवासींची जीवनपद्धती स्वतंत्र असून ते आपल्या प्रथा परंपरांचे काटेकोरपणे पालन करतात. त्यांची वेशभूषा ही ग्रामीण व नागरी समुदायापेक्षा भिन्न आहे. भारतातील आदिवासी जमात हे एकाच वंशाचे नाही. त्यांच्यात वांशिक विविधता आहे. त्यांची संस्कृती सारखी नाही. परंतु सर्व जमातीत संस्कृतीमध्ये विविधता आढळून येते. भारतात ८.४ कोटीच्या आसपास आदिवासींची लोकसंख्या आहे. समाजशास्त्रज्ञ गियर्सन यांनी केलेल्या इ. स. १८९० च्या पाहणीनुसार भारतात १७६ भाषा व ५४४ बोलीभाषा आहेत. त्यापैकी ११६ भाषा व ४०० बोली भाषा आदिवासींच्या आहेत. त्यामध्ये महाराष्ट्रात आदिवासींच्या ४७ जमाती असून ८५.७७ इतकी लोकसंख्या आहे. ही जमात महाराष्ट्राच्या १५ जिल्ह्यात आढळून येते. आदिवासींच्या विविध रीतीरिवाज, चालीरिती, परंपरा असून त्यांची बोलीभाषा वेगवेगळी आहेत.

आदिवासींच्या संस्कृतीचा विचारवंतांनी विविध अंगानी अभ्यास केलेला आढळतो. गोंडी भाषेचे प्रचारक भावसिंग मसराम यांनी आदिवासींचा इतिहास , संस्कृती भाषा आणि लिपीचा अभ्यास केला. त्यांनी गोंडी लिपी, व्याकरण, लोकसाहित्यावर लेखन केले. आदिवासी साहित्याचे सौंदर्यपूर्ण दालन, लोकसाहित्याचे दालन अतिप्राचीन व समृद्ध सकस आहे. थोडक्यात सांगायचे म्हणजे निसर्ग जेवढा स्वयंपूर्ण, शक्तिमान, निरंतर, सुंदर, स्वच्छ, संपन्न आणि प्राचीन आहे. तेवढेच आदिवासींची संस्कृती मौलिक व श्रीमंत आहे. सुप्रसिद्ध साहित्यिक डॉ. विनायक तुमराम यांनी आदिवासींचा धर्म म्हणजेच निसर्गपूजक होय. असे म्हटले, तर आदिवासी संस्कृती विषयी अभ्यासक एल. के. मडावी म्हणतात की, आदिवासींच्या रक्ताचे जीन्स व बौद्ध रक्तातील जीन्स समान आहेत. म्हणून ते बौद्ध संस्कृतीचे वारसदार आहेत. असे म्हंटले आहे. भारतीय संविधानाने अनुच्छेद १६ (१) नुसार प्रत्येक नागरिकास भाषा, लिपी व संस्कृती जतन करण्याचा अधिकार दिलेला आहे. परंतु वर्तमानात मात्र प्रस्थापित समाजव्यवस्थेमार्फत आदिवासी संस्कृती चिरडण्याचा तिला गालबोट लावण्याचे प्रयत्न सुरु आहेत. हे वास्तव नाकारता येत नाही.

आदिवासी समुदाय हा परंपरागत वेशभूषेत असला तरी संस्कृतीशी त्याची नाळ घट्ट जुळलेली आहे. सामाजिक बांधिलकी स्वीकारून तो आपली संस्कृती जतन करण्याचा प्रयत्न करतो. १९०१ मध्ये हर्बट रिस्ले यांनी भारतीय लोकांचे वांशिक वर्गीकरण करण्याचा प्रयत्न केला. त्यामध्ये शारीरिकदृष्ट्या त्यांनी एकूण सात वंश मानले आहेत. त्यामध्ये इंडो आर्यन, द्रविडीयन, मंगोलोईड, आर्य द्रविड, मंगोलो द्रविडीयन, सिथो द्रविडीयन आणि तुर्की इराणीयन इत्यादी. १९३१ मध्ये डॉ. बी. एम. गुहा यांनी निग्रिटो, पॅलिओ मंगोलाइड, तिबेटी मंगोलाइड तर पश्चिमेकडील मेडीटोरेनियन आणि नॉर्डिक या गटात विभाजन केले. तात्पर्य आदिवासी हे संस्कृतीच्या विविध टप्प्यावर उभे आहेत. आदिवासी संस्कृती विषयी भाष्य करताना प्रा. नागगोंडे म्हणतात की, "सृष्टीच्या आरंभापासून ते वर्तमान काळापर्यंत मानवाचा शारीरिक, सामाजिक विकास व वर्तन यांचे शास्त्रशुद्ध विवेचन मानवशास्त्रात केले जाते."[६] हे विधान अगदी ग्राह्य मानले पाहिजे.

## वैशिष्ट्ये

१) आदिवासींमध्ये श्रद्धा, परंपरा,(मंत्र –तंत्र ) या सर्वांना अनन्य साधारण महत्व असते. निसर्गपूजक अशी आदिवासींची ओळख आहे. त्यांचा लौकिक आहे.
२) प्रत्येक आदिवासी जमातीची स्वतंत्र लोकभाषा असते.
३) आदिवासी जमाती ह्या प्रामुख्याने दुर्गम भागात, जंगलात वास्तव्यास राहतात. समूह करून राहणाऱ्या या वसाहतींचे क्षेत्रफळ प्रगत समाजाच्या तुलनेत कमी आहे.
४) मद्य व नृत्य हा त्यांच्या संस्कृतीचा व जीवनाचा अविभाज्य असा भाग आहे.
५) अंगावर गोंदण करण्याची रूढी आहे.

आदिवासी समाजाची संस्कृती ही आदिम असून ती वैशिष्ट्यपूर्ण आहे. त्यांचेमध्ये ज्ञानाचा अभाव जाणवत असला तरी जीवनमूल्ये पोटतिडकीने जपणारा आहे. पारंपारिक समारंभ सण –उत्सव याद्वारे संस्कृती जतन करत ते एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे संक्रमित करतात. खऱ्या अर्थाने हीच त्यांची ज्ञान परंपरा होय. असे म्हटले तर ते अतिशयोक्ती ठरणार नाही.

## समारोप

एकूणच सारासार विचार करता अनेक वैशिष्ट्यांनी नटलेली ही आदिवासी संस्कृती, वैश्विक संस्कृतीचा आदिम स्त्रोत आहे. समाजाला काही देण्याच्या दृष्टीने त्यांचेकडे संस्कृती ही मोलाचा दागिना ठरू पाहते आहे. तिचे संवर्धन करण्यासाठी वर्तमानात सकारात्मक दृष्टीने त्याकडे पाहण्याची नितांत गरज आहे.

## निष्कर्ष

१) आदिवासी समुदाय हा आपली संस्कृती जपणारा आहे.
२) निसर्गपूजक अशी स्वतंत्र ओळख निर्माण केली आहे.
३) जीवनमूल्ये यांना प्राधान्यक्रम देणारा समुदाय अशी ख्याती प्राप्त.
४) पुढील पिढीसाठी पूरक ठरेल अशी संस्कृती टिकविण्याला प्राधान्यक्रम.

## संदर्भ


1. डॉ. चंद्रकांत गायकवाड (2010) आदिवासी संस्कृती आणि साहित्य संगत प्रकाशन, नांदेड, प्रथम आवृत्ती, पृ. 14
2. सुरेशचंद्र वारघडे (1994) महाराष्ट्रातील आदिवासी वनश्री प्रकाशन, पुणे, प्रथम आवृत्ती, पृ. 5
3. डॉ. प्रदीप आगलावे (2004) आदिवासी समाजाचे समाजशास्त्र श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर, प्रथम आवृत्ती, पृ. 2
4. प्रा. सीमा चव्हाण(2011)आदिवासी संशोधन पत्रिका, Tribal Research &Training Institute महाराष्ट्र राज्य पुणे, VOl- No- 2,, पृ. 34
5. प्रा. गुरुनाथ नागगोंडे (1979) भारतीय आदिवासी कॉन्टिनेन्टल प्रकाशन पुणे,प्रथम आवृत्ती , पृ. 253
6. प्रा. गुरुनाथ नागगोंडे (1979) भारतीय आदिवासी कॉन्टिनेन्टल प्रकाशन पुणे,प्रथम आवृत्ती, पृ. 21